कर आकारणी व कर संकलन कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र. :- TCO ३६८३
दिनांक :- ७।१२।१०

**कार्यालयीन आदेश**

विषय :- महानगरपालिकेच्या हद्दीतील वर्कशॉप, पेट्रोलपंप व प्राथमिक, माध्यमिक शाळा, उच्च शिक्षण संस्था या मिळकतीच्या कर आकारणी बाबत.

संदर्भ :- १) कार्यालय परिपत्रक जा. क्र. मआ/उरावि/१२७, दि. ०७/०७/२००७.
२) मा. महापालिका आयुक्त यांची मान्यता ठ.क्र. ६/४६, दि. ३०/४/२००८.
३) मा.महापालिका आयुक्त ठराव क्रं.८/६३० दिनांक २३.११.२०१०

महानगरपालिकेच्या हद्दीतील वर्कशॉप, पेट्रोलपंप व प्राथमिक, माध्यममिक शाळा, उच्च शिक्षण संस्था या मिळकतीच्या कर आकारणी संदर्भात व मे. धर्मादाय आयुक्त यांचे प्रमाणपत्रास अनुसरुन द्यावयाच्या सूट संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचेकडे निवेदन सादर करण्यात आले असून मा. विधी सल्लागार व मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(ज) यांचे अभिप्रायास अनुसरून मा. महापालिका आयुक्त यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये महानगरपालिकेच्या हद्दीतील वर्कशॉप, पेट्रोलपंप व प्राथमिक, माध्यममिक शाळा, उच्च शिक्षण संस्था या मिळकतीच्या कर आकारणी संदर्भात स्थानिक प्रधिकरी मतदार संघ निवणूक आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे. दिनांक १३.११.२०१० रोजी सदर आचारसहिंता संपलेली असल्याने दिनांक १४.११.२०१० पासून खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) मा. विधी सल्लागार यांचा अभिप्राय एमपीओ १७७९ दिनांक २.९.२०१० विचारात घेऊन वर्कशॉपची कर आकारणी बिगरनिवासी दराने निश्चित करण्यात यावी.

२) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत असलेल्या पेट्रोलपंपाची कर आकारणी जमिनी अंतर्गत असणाऱ्या टाक्याची तेल व्यावसायीक कंपन्यानी कळविलेल्या पत्रामध्ये नमुद केलेला बांधकामाचा खर्च शासन मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारक(Valuer) सर्टीफिकेटस विचारात घेऊन त्यावर ९% दराने बिगरनिवासी वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेस व पेंट्रोलपंपाच्या आवारातील मोकळ्या जागेची करआकारणी बिगरनिवासी दराने करण्यास व ज्या जागेत पेट्रोल पंपाचे कार्यालय व अन्य मिळकत आहे अशांची करआकारणी बिगरनिवासी वाजवी भाड्याच्या दराने निश्चित करण्यात यावी.

सर्व सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख, सर्व विभागीय निरीक्षक, सर्व संपर्क अधिकारी व सर्व पेठ निरीक्षक यांनी दिनांक १४.११.२०१० पासून वर्कशॉपची करआकारणी बिगरनिवासी दराने व पेंट्रोलपंपांची करआकारणी जमिनी अंतर्गत असणाऱ्या टाक्याची तेल व्यावसायीक कंपन्यानी कळविलेल्या पत्रामध्ये नमुद केलेला बांधकामाचा खर्च शासन मान्यताप्राप्त मूल्यनिर्धारक(Valuer) सर्टीफिकेटस विचारात घेऊन त्यावर ९% दराने बिगरनिवासी वार्षिक करपात्र रक्कम निश्चित करणेस व पेंट्रोलपंपाच्या आवारातील मोकळ्या जागेची वार्षिक करपात्र रक्कम बिगरनिवासी दराने करण्यास व ज्या जागेत पेट्रोल पंपाचे कार्यालय व अन्य मिळकत आहे अशांची वार्षिक करपात्र रक्कम बिगरनिवासी वाजवी भाड्याच्या दराने निश्चित करणेबाबत कार्यवाही करावी.

कळावे.

७।१२।१०

उप आयुक्त तथा
**कर आकारणी व कर संकलन प्रमुख,**
**पुणे महानगरपालिका.**

९.१२

प्रत.
सर्व सहाय्यक करआकारणी व करसंकलन प्रमुख
सर्व विभागीय निरीक्षक
सर्व संपर्क अधिकारी
सर्व पेठनिरीक्षक
मुख्यलेखापरिक्षक कार्यालय यांना पुढील कार्यवाहीसाठी..